
# पालखी



म. ग्रं. सं. ठाणे
विषय काव्य
सं. क्र. २२६३

मिलिंद

२०७६१
काव्य
११-९-५५

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
२०७६१
काव्य

# पा ल खी

मिलिंद

जयहिंद प्रकाशन : ३४५

आवृत्ती पहिली :
आषाढी एकादशी–१९ जुलै १९७५

C सौ. शालिनी जाओल

मुखपृष्ठ :
श्री. अनंतराव मोखले

प्रकाशक :

ग. का. रायकर
जयहिंद प्रकाशन
झावबाची वाडी मुंबई २

मुद्रक :

अतुल पुराणिक
धूतपापेश्वर प्रेस
पनवेल–कुलाबा

मूल्य तीन रुपये

# चालली पालखी

लहानपणी पनवेलला शाळेंत असतांनाच भाऊबीजे निमित्त अेक कविता लिहिली आणि तेव्हांच माझ्या काव्यलेखनाचा श्रीगणेशा झाला असं म्हणायला हरकत नाही. ती कविता मला स्फुरली की मी बनवली हे आज लक्षांत नाही, परंतु पूर्ण केल्यानंतर मात्र कोलंबसला अमेरिका सांपडण्यापेक्षां फार मोठा आनंद मला झाला हे निश्चित. तेव्हांपासून कविता वाचण्याचं वेड लागल. अधून मधून कविता करू लागलो. पुढे अिंग्रजी पांचवीत आमच्या वर्गांत श्री. गजा साळवी नांवाचा मुलगा आला. ओळख झाली, मैत्री वाढली आणि त्याने चांगल्या साहित्याशी ओळख करून दिली. त्याच वर्षी आम्ही हस्तलिखित मासिक काढलं. त्याचे प्रकाशन ट्रेनिंग कॉलेजचे त्यावेळचे प्राचार्य श्री. नी. शं. नवरे यांच्या हस्ते झाले. त्या प्रसंगामुळे त्यांचा परिचय झाला. वय आणि ज्ञान यांतला फरक लक्षांत घेऊनही त्यांनी आम्हा विद्यार्थ्यांबरोबर मैत्रिचे संबंध प्रस्थापीत केले. श्री. गजा साळवी याने निर्माण केलेली साहित्याबद्दलची आवड श्री. नवरेसाहेबांनी पुष्कळच वाढवली. नवी दिशा मिळाली. त्यांच्यामुळे बरेच वाचन घडले.

दा. क्र.

नंतरच्या काळांत थोड्याफार कविता लिहिल्या. निरनिराळ्या नियतकालिकांतून प्रसिद्धही झाल्या. 'वाङ्मय-शोभा' त्यापैकीच अेक. बोलण्याच्या ओघांत माझे स्नेही व वाङ्मयशोभेचे संपादक श्री. मनोहरपंत केळकर यांनी ही कल्पना सुचवली. 'पालखी' याच शीर्षकाचे सदर सुमारे वर्षभर 'वाङ्मय-शोभा' मासिकांत लिहिले. त्यानिमित्ताने हे काव्यलेखन झालं. त्याचे श्रेय श्री. केळकर यांनाच आहे. या काव्य प्रकाराचे मग आकर्षण निर्माण झाले. सह्याद्री, स्वराज्य, अविष्कार, दीपलक्ष्मी, पराग, रझिया, लोकसत्ता, महाराष्ट्र, किल्ले रायगड, राजहंस वगैरे मासिक वा दिवाळी अंकांतून अशाच प्रकारचे साहित्य प्रसिद्ध झाले.

दिल्लीला असतांना केवळ कथा-काव्यलेखन करणे अेवढाच अुद्देश डोळ्यासमोर होता. पुस्तक प्रकाशनाची कल्पनाही मनात डोकावली नाही. परंतु दिल्ली सोडून डोंबिवलीला आल्यानंतर येथील काव्य रसिक मंडळाच्या निमित्ताने सुप्रसिद्ध साहित्यिक श्री. प्रभाकर अत्रे यांचा परिचय झाला. गप्पांच्या ओघांत संग्रहाची कल्पना सुचली आणि ती उचलून धरली. संग्रहाला 'पालखी' हेच नांव देण्याचे

ठरले. श्री. ग. का. रायकर यांचा बऱ्याच वर्षांचा परिचय. त्यामुळें कविता संग्रह 'जयहिंद प्रकाशन' तर्फे प्रसिद्ध होणे अपरिहार्यच. मित्रवर्य गजा साळवी, प्राचार्य नी. शं. नवरे, श्री. मनोहरपंत केळकर, श्री. प्रभाकर अत्रे व श्री. ग. का. रायकर या मंडळींचा मी ऋणी आहे. काही माणसांच्या ऋणात रहाणेच सुखावह असते. अशी आहे 'पालखी' ची पूर्वपीठिका. अर्थात् 'पालखी' संबंधी बरे वाईट मत शेवटी ज्याचे त्यानेच ठरवायचे आहे.

—मिलिंद

डोंबिवली,
आषाढी एकादशी
एकोणीस • सात • पंच्याहत्तर

ती. आऊीस

तुझ्या ऋणांतून

कधीच मुक्त

होता येणार नाही

**नाना**

चालली पालखी
अनंताच्या वाटे
बोंचणार कांटे
आतां नाहीं.

सुख आणि दुःख—
गेलो पलीकडे
उघडीं कवाडें
क्षितिजाची.

चंदनाचा स्पर्श
जळो माझे जिणें
पुन्हां नाही येणें
पांडुरंगा.

कढत श्वासाची
जाहली सोबत
पाय चालतात
हळू आतां.

हिशेब जन्मीचा
राहिलेलें देणें
तू आतां फेडणें
मजसाठीं.

झालों वारकरी
घडली अनंत
संतांची संगत
याच मार्गीं–

आतां पालखीला
नाहीं ओझें फार
उरलों लाचार
तुझ्या पायी.

मिटलेल्या डोळां
पाहातों ब्रह्मांड
संपले कुंभांड
जीवीताचे.

खूण राही मागे
चिमटीची राख
सरला दिमाख
प्रकाशाचा.

अंधाराला आतां
काळोखाचे डोळे
उजाड उन्हाळे
पहाणें मी.

नद्या नाले ओढे
पाणी सागराचे
मोल आसवांचे
कमी नाही

उरे मालकीचे
हेच एक दान
चरणी वाहीन
भक्ती भावें

जळे नंदादीप
काजळीचे देणे
प्रीतीचे उखाणे
गीरवीत

उरे गाभाऱ्यात
वेदनेचा रंग
वासनेत दंग
तृषार्त मी

जीभेवरी ओवी
अमृताचा कण
हेच पांघरुण
प्राजक्ताचे

प्रेमे बोलावीले
तेव्हां नाही आलो
अर्थाविना शब्द
वेदांती रमलो

आता मंदिरांत
वाजवीतो घंटा
ठावे ना तूं येणे
कपाळ करंटा

अपेक्षेचे पाप
मनात टेविले
तुला आळविले
मंदिरात

म्हणोनी म्हणसी
भक्ती माझी थोटी
आता गर्दी मोठी
कशासाठी

दिसेल तेवढें
पाहोनिया घ्यावें
आपुल्या चालीनें
जपून चालावें

मना कावियली
वेदांताची गोडी
पाऊलें पडतीं
परी गा वांकुडीं

पंढरीची वाट
राहियली दूर
त्यजिता कवाड
झालों निराधार

शब्द तुझ्यासाठी
बोलोनिया उणा
आपुल्या गा घरी
झालो मी पाहुणा

व्यथा माझी मोठी
भरलेली कूस
पाप पुण्य नको
एकांताची आस

देणारा तू मोठा
आकाश जमीन
मापटे लहान
माझ्या हाती

तुझे घेवोनिया
तुला थोडे देणे
जगात हासणे
होई माझे

क्षितीजा वरती
संपलेली कक्षा
म्हणोनी आकांक्षा
आभाळाची

चंदनाचे खोड
झिजतांना हंसे
वाटे सांगूं कसे
दुःख माझे

दुःख माझे आता
प्राजक्तचे फूल
मोक्षाची चाहूल
चिंतनात

शेत भरलेले
नाव दाण्यावरी
येईन अधरी
माझा एक

उरलेले कांहीं
नको मला देवा
करीन ना हेवा
कोणाचाही

तुझ्यापासून मी
लपवीत नाही
ठावे सर्व कांहीं
पांडुरंगा

तुझेच घेवोनी
थोडें तुला दिलें
नाहीं संतोषलें
मन माझें

वेदनेचा देठ
तुटता तुटेना
अर्ध्या मार्गावरी
ओळख पटेना

असे मी घेतलें
सतीचें हें वाण
आज कशासाठीं
मांगल्याची खूण

रक्तामध्यें माझ्या
वासनेचीं फुलें
नको मोक्ष आतां
बरें पाप ओलें !

पाप पुण्य गेले
हिशेब ऐहिक
केली सोयरीक
संतांसंगे

मंदिरात तुझा
पाहिला दिमाख
परी तुझी मेख
भक्तालागी

२०८६१
चरित्र

चंदानाच्या साठी
मन झाले वेडे
जळता कळाले
लाकूड बापुडे

उघड्या डोळ्यांना
वेडवीते जग
मिटल्या नयनी
मनाची गा आग

वेड तू लाविले
ब्रह्म आणि माया
पाहता डोळ्यांनि
विटाळली काया

ओठी भिजवीला
शब्द एक मुक्ती
नदीचे किनारे
कधी ना भेटती

म्हणे गेल्या जन्मी
केले आम्ही पाप
म्हणोनी हा ताप
जन्म आता
देणे घेणे सारे
ज्याचे त्याला दिले
म्हणसी उरले
कैसे आता.

गोडी तूं लाविली
अमृताची चव
म्हणोनी बेचव
जीणे नोहे.

मागितला नाही
जन्म दिला तूंच
वाटते उगाच
आलो येथे
क्षितिजावरती
वाट अडवली
स्मृती विसरली
पलीकडे
चौऱ्याऐंशी लक्ष
कूस उजविणे
मिळे ते सोसणे
भाळी आले
ठरे मात्र माझी
वांझोटी गा भक्ती
नको मला मुक्ती
दान तुझे

क्षितीजा मधली
वाट अवघड
बंद गा कवाड
सदा तुझे
जन्म हाची शाप
झाला भयंकर
वरती अंबर
वेडाविते

जळी स्थळी पाषाणीही भरून राहिला
मन माझे क्षुद्र, म्हणे-अव्हेर गा केला
दधीचीही आहे मोठा अस्थी करी दान
आत्मयज्ञ जीवनाचा कोणी ना लहान
पाषाणाची पूजा केली लाविला शेंदूर
कळसावाचून माझे राहिले मन्दिर

आकाशाचे अंडे
केव्हां उबणार
मोक्ष दिसणार

क्षितिजाची गांठ
आहे घट्ट मोठी
भक्ती माझी थिटी

तुझा एक अश्रू
दुःख झाले पीस
अमृताचा वास
मातीमध्ये

जन्मभरी चाले
कंगाल लाचार
शब्द जिभेवर
भिक्षा देही
आता राहावेना
केली वाटमार
चुकला प्रहार
दैव खोटे
मरणाच्या दारी
अंती हाती आले
निखारे फुलले
रित्या घटी

हातात राहील
तेवढेच घ्यावे
उरलेले दान
संतांचिया नांवे

संतांच्या वेदना
वेदाहून मोठ्या
दान देता नको
कपाळाला आठ्या

पायाचे गा गोल
चालताना कळे
सूर्य असताही
नंदादीप जळे

भिंत घेवोनिया
ज्ञानदेव गेले
उघडे पडले
भक्तगण

ज्ञानदेव जाता
भिंत कोसळली
पोरकी जाहली
ओवी माझी.

हाती आले तेवढेच
घेवोनी चालावे
दिसणार नाही सारे
सोडोनिया द्यावे

मुखी घास घालताना
त्याच्या नावे थोडे
चालताना पाऊलही
अडू नये वेडे

संतांची संगत
झाली योगायोग
चंदनाचे अंग

वाटेवरी अर्ध्या
अडलो बापुडा
उरे भक्त वेडा

रंगहीन रात्र आज पालखी विसावली
गंधहीन जीवनांत भैरवी निनादली
ब्रम्ह सत्य सांगण्यात शब्द भाव वेचिले
काव्य कोरडे नभांत शाम मेघ दाटले
सोबती न थांबणे कुणी, विचार संपला
भेटवीन एकदा प्रकाश, दीप लागला
भाव संपला तुझा वसुंधरे, प्रेमद्वरे
काय सांग जाहला गुन्हा, म्हणुनी कोप रे
मागणे पुन्हा कधी न जन्म वा हवी सखी
लक्ष्य मार्ग संपवून थांबणार पालखी.

घेतांना घेतले
आभाळ फाडून
दाही दिशांतून
मिळाले ते

देतांना मी मात्र
थोडे थोडे देतों
हिशेब पाहतों
पाप-पुण्य

मनामध्ये ईर्षा
तूंच रुजविली
म्हणूं नको आता
पत घालविली

देणें ज्याचे त्याचे
देउनि टाकलें
मोक्षासाठी आता
थोडें पुण्य ओलें

चंदनाच्या चितेवर
जळो आता माझे जिणे
राहिले ना काही उणे
विठ्ठलागी

पाप पुण्य देणे मोटे
कोणी जामीन ना मला
भलता व्यापार केला
जीवनाचा

घरणीवरूनी

नभांत नजर
देह आणि मन
क्षितिज अंतर

माझ्या घरी झालो
परस्थ पाहुणा
आठवणी ओझे
ओळख पटेना

असा कधी होतो
देहाचाच भार
वाटे निराकार
जिणे हवे

धरणीवरूनी
नभांत नजर
देह आणि मन
क्षितिज अंतर

माझ्या घरी झालो
परस्थ पाहुणा
आठवणी ओझे
ओळख पटेना

असा कधी होतो
देहाचाच भार
वाटे निराकार
जिणे हवे

पापपुण्यासाठी
असेल हे कर्म
मला नको धर्म
देवा तुझा

धर्म तुझा मोठा
असू दे बापुडा
चिरेबंदी वाडा
मन्दिराचा

मन्दिरांत सदा
पक्वान्नाची रास
वरती आरास
कळसाची

कळस सोनेरी
वृथा अभिमान
खरे समाधान
नांव घेता

चंदनाचे दुःख झिजतांना ओले
पणतीचा मान अंधारात कळे

वटवृक्ष मोठा खुशाल आरती
वादळी वाऱ्यात लव्हाळे वाचती

पूजा ना बांधली कधी तुझी देवा
आठविले सदा उत्सव वणवा

ठेवा आसवांचा नाही संपणार
विचार ना मनी मोक्ष मिळणार

क्षितिजी भेटती
आकाश जमीन
त्रिवेणी संगम
माझियावाचून

भेटीसाठी झालें
मन माझें वेडें
तुझ्या मंदिराची
बंद गा कवाडें

वेड्यासाठीं नाहीं
सोन्याचें कवाड
नको पुण्य तुझें
पाप मला गोड

नाना रंग येथें
पाहोनिया थाट
शरीर लोचट
आवरेना
ओली हिरवळ
मृदु पायीं स्पर्श
ओसंडतो हर्ष
मनोमनीं
परी मन वेडें
कष्टी पिंजऱ्यांत
उंच आकाशांत
दृष्टी लावी
अकरावी दिशा
तुझ्याकडे येण्या
निस्तेज चांदण्या
सोबतीला
शरीराचा तट
केव्हां कोसळेल
मोक्षाचा मिळेल
नित्यवास

मरणाच्या हातीं
निरोप धाडोनी
शब्दांमध्ये आता
घेतले बांधोनी

मला फसविलें
देवा हातोहात
मरणाच्या दारी
नाहीं कोण तात

पाप पुण्य मुक्ती
नको तारांगण
वाटे हवे आता
निराळे स्मशान

२०८५७

कळलें उशीरा
चुकले मागणें
मिळालें जें हातीं
जन्मी या भोगणें